आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)

रविवार दिनांक २१ डिसेंबर २०२५

<u>ठळक बातम्या</u>

1. २८८ नगरपरिषदा, आणि २८५ नगराध्यक्षपदांच्या निवडणुकांत महायुतीची मुसंडी भाजप ठरला पहिला पक्ष
2. भाजप नेते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या गृह नगर असलेल्या नागपूर जिल्ह्यात १५ पैकी तब्बल १२ नगरपालिकांमध्ये भाजपचे नगराध्यक्ष ; कामठीत 40 वर्षानंतर फुलले कमळ
3. विमान कंपन्यांनी प्रवाशांच्या सोयींबाबतच्या नियमांचं काटेकोरपणे पालन करावं – हवाई वाहतूक मंत्रालयाचे निर्देश
4. १९ वर्षांखालच्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारताचा पाकिस्तानकडून पराभव

<u>राज्य निकाल</u>

राज्यातल्या २८८ नगरपरिषदांच्या आणि २८५ नगराध्यक्षपदांच्या निवडणुकांची मतमोजणी आज सुरु झाल्यापासून राज्यात बहुतांश ठिकाणी महायुती ने मुसंडी मारले असून भारत भारतीय जनता पार्टी हा सर्वात मोठा पक्ष ठरला आहे या विजयाबद्दल आज नागपूर मध्ये प्रसार माध्यमांशी बोलताना भाजप नेते आणि . मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भारतीय जनता पार्टीने या निवडणुकीत विक्रम प्रस्थापित केल्याची माहिती दिली

*बीजेपी यह सबसे बड़ी पार्टी बनकर उभरी है 129 शहरों के प्रेसिडेंट नगराध्यक्ष ये भारतीय जनता पार्टी के बने हैं 75% नगर पालिकाओं में बीजेपी, शिवसेना और राष्ट्रवादी महायुती के नगराध्यक्ष बने हैं बीजेपी ने एक नया रिकॉर्ड कायम किया है 48% नगरसेवक पूरे राज्य के ये बीजेपी के सिम्बॉल पर चुनकर आए हैं करीब 3500 हमारे 3300 हमारे नगरसेवक चुनकर आए हैं महाराष्ट्र में एक रिकॉर्ड हम लोगों ने किया है और एक प्रकार से लोगों ने महाराष्ट्र की सरकार के कामों पर और जो विकास का एजेंडा हमने लोगों के सामने रखा उस पर मुहर लगाई है।*

नगरपालिका, नगरपंचायत निवडणुकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुतीला दणदणीत यश देऊन मतदारांनी विकास, सेवा, सुशासनला कौल दिला आहे. असून भाजपावर मोठा विश्वास दाखविल्याबद्दल जनतेचे आभार मानतो असे प्रतिपादन

भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी मुंबइच्या. भाजपा प्रदेश कार्यलयात झालेल्या विजयोत्सवावेळी केले. ढोलताशांचा गजर करत ,गुलाल उधळत, मिठाई वाटप करीत भाजपाचा विजय साजरा करण्यात आला. नगरपालिका, नगरपंचायत निवडणुकीत मतदारांनी विकासाच्या मुद्द्यावर भारतीय जनता पार्टीला कौल दिला आहे. राज्यात पायाभूत सुविधा विकासाची मोठी कामे महानगरांमध्ये सुरु आहेत. याच कामांच्या आधारावर महापालिका निवडणुकीतही मतदार विकासाच्या मुद्द्यावर महायुतीला विजयी करतील, असा विश्वासही चव्हाण यांनी व्यक्त केला.

विदर्भ स्थानिक स्वराज्य संस्था निकाल

भाजप नेते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या गृह नगर असलेल्या नागपूर जिल्ह्यात झालेल्या नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाने घवघवीत यश मिळवले आहे. एकूण १५ नगरपालिका आणि १२ नगरपंचायतींच्या निवडणुकांचे निकाल आज जाहीर झाले असून, १५ पैकी तब्बल १२ नगरपालिकांमध्ये भाजपचे नगराध्यक्ष निवडून आले आहेत.

या निवडणुकांमध्ये केवळ एका नगरपालिकेत काँग्रेसला, एका ठिकाणी शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसला आणि एका नगरपालिकेत शिवसेना (शिंदे गट) ला यश मिळाले आहे. उर्वरित सर्व ठिकाणी भाजपने बाजी मारली आहे.

भाजपचे नगराध्यक्ष कामठी, सावनेर, उमरेड, खापा, वाडी, कळमेश्वर यांच्यासह इतर नगरपालिकांमध्ये निवडून आले आहेत. शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसने काटोल नगरपालिकेत अध्यक्षपद पटकावले आहे, तर शिवसेना (शिंदे गट) ने रामटेकचा गड राखण्यात यश मिळवले आहे.दरम्यान पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कामठी नगरपालिकेत भाजपला प्रथमच यश मिळाले आहे. सावनेर नगरपालिकेत भाजपने पुन्हा एकदा काँग्रेस नेते व माजी मंत्री सुनील केदार यांना मोठा धक्का दिला आहे.

चंद्रपूरच्या 11 पैकी अवघ्या 2 ठिकाणी भाजपला यश काँग्रेसने ब्रम्हपूरीसह सर्वाधिक 7 नगरपालिका जिंकल्या गडचिरोली: जिल्ह्यातील गडचिरोली, आरमोरी व देसाईगंज या तिन्ही नगर परिषदांमध्ये नगराध्यक्षपदाची निवडणूक जिंकत भाजपने सत्ता प्रस्थापित केली. गडचिरोलीत प्रणोती निंबोरकर, आरमोरीत रुपेश पुणेकर, तर देसाईगंजमध्ये लता सुंदरकर विजयी झाल्या.गोंदिया नगर परिषदेत काँग्रेस पक्षाचे सचिन शेंडे तर गोरेगाव नगर पंचायतीत काँग्रेस पक्षाचे तेजराम बिसेन आणि सालेकसा नगर पंचायतीत काँग्रेस पक्षांचे विजय पुंडे तर तिरोडा नगर परिषदेत भाजपचे अशोक असाटी नागराधक्ष म्हूणन निवडून आले आहेत अमरावती जिल्ह्यातील १० नगरपरिषद व २

नगरपंचायतींसाठी २ आणि २० डिसेंबरला दोन टप्प्यात मतदान झाले, या निवडणुकीत १२७ नगराध्यक्ष उमेदवारांसह १,३२१ उमेदवार सदस्य रिंगणात होते. ज्यात शिवसेना, राष्ट्रवादी, वंचित बहुजन आघाडी, युवा स्वाभिमान, बंडखोर व अपक्षांचा समावेश होता.शेंदुर्जना घाट नगरपंचायतीमध्ये भाजपचे सुवर्णा हरिभाऊ वरखडे, चांदुर रेल्वे नगर परिषदेमध्ये वंचित बहुजन आघाडीच्या डॉ. प्रियंका विश्वकर्मा, धामणगाव रेल्वे नगरपरिषदेमध्ये भारतीय जनता पक्षाच्या अर्चना रोटे, नांदगाव खंडेश्वर मध्ये प्राप्ती विलास मारोटकर, मोर्शी नगरपरिषदे मध्ये शिवसेना शिंदे गटाच्या प्रतीक्षा गुल्हाने, वरुड मध्ये भाजपचे ईश्वर सलामे, अंजनगाव नगर परिषदेच्या नगराध्यक्ष म्हणून भाजपचे अविनाश गायगोले, दर्यापूर नगराध्यक्षपदी काँग्रेसच्या मंदाकिनी भारसाकडे, चांदूर बाजार प्रहारच्या मनीषा नांगलिया, अचलपूर नगर परिषदेमध्ये भाजपच्या रूपाली अभय माथाने, चिखलदरा नगरपरिषद मध्ये काँग्रेसचे शेख अब्दुल विजय झाले आहेत तर धारणी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष म्हणून सुनील चौथमल यांनी विजय संपादन केला आहे.अकोला जिल्ह्यातील बार्शीटाकळी नगरपंचायत निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीने एकतर्फी विजयाचा झेंडा फडकवला आहे. वंचितच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार अफसर खातून अलीमुद्दीन यांनी तब्बल ९,१९३ मतांनी विजय मिळवला असून, भारतीय जनता पक्षाच्या कोकिळा येळवणकर यांना पराभव स्वीकारावा लागला आहे. जिल्ह्यातील नगराध्यक्षाच्या 04 ठिकाणी भाजप आणि एका ठिकाणी काँग्रेस विजयी झाली आहे बुलढाणा नगर परिषद अध्यक्ष निवडणुकीत शिवसेनेच्या पूजा संजय गायकवाड विजयी झाले आहे

हवाई वाहतूक

धुकं आणि कमी दृश्यमानतेमुळे विमान वाहतूक विस्कळीत झाली, तर विमान कंपन्यांनी प्रवाशांच्या सोयींबाबतच्या नियमांचं काटेकोरपणे पालन करावं, आणि विमानतळांवर पुरेसे कर्मचारी नियुक्त करावेत, असे निर्देश केंद्रसरकारनं दिले आहेत. हवाई वाहतूक मंत्रालयानं आज याबाबतचं प्रसिद्धीपत्रक जारी केलं.

विमान कंपन्यांनी प्रवाशांना विमानाच्या स्थितीबाबत वेळेवर आणि अचूक माहिती द्यावी, प्रवासाला अधिक विलंब झाला, तर भोजन आणि अल्पोपहाराची व्यवस्था करावी, तिकीट रद्द झालं, तर पुन्हा आरक्षण अथवा तिकिटाच्या पैशाचा परतावा करण्याची व्यवस्था करावी, तसंच वेळेवर ‘चेक-इन’ केल्यावर ‘बोर्डिंग’ साठी मनाई करू

नये, असं यात म्हटलं आहे. सामानाची हाताळणी आणि अल्पवयीन मुलांची देखभाल, याबाबतच्या सूचनाही यात दिल्या आहेत.

विधेयक संमत

राष्ट्रपतींनी आज विकासित भारत - रोजगार आणि उपजीविका हमी अभियान (ग्रामीण): व्हीबी-जी राम जी (विकसित भारत - जी राम जी) विधेयक, २०२५ ला मान्यता दिली, जे ग्रामीण रोजगार धोरणात एक महत्त्वपूर्ण बदल आहे. हा कायदा ग्रामीण कुटुंबांसाठी दर आर्थिक वर्षात १२५ दिवसांच्या वेतन रोजगाराची वैधानिक हमी वाढवतो आणि सक्षमीकरण, समावेशक वाढ, योजनांचे एकत्रीकरण आणि सेवा वितरणाची संपृक्तता वाढवतो, ज्यामुळे समृद्ध, सक्षम आणि स्वावलंबी ग्रामीण भारताचा पाया मजबूत होतो.यापूर्वी, संसदेने विकासित भारत - रोजगार आणि उपजीविका हमी अभियान (ग्रामीण) विधेयक, २०२५ मंजूर केले, ज्यामुळे भारताच्या ग्रामीण रोजगार आणि विकास चौकटीत निर्णायक सुधारणांचा मार्ग मोकळा झाला. हा कायदा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा, २००५ (महात्मा गांधी नरेगा) ची जागा घेतो आणि २०४७ पर्यंत विकसित भारताच्या राष्ट्रीय दृष्टिकोनाशी सुसंगत उपजीविका सुरक्षा मजबूत करण्यासाठी एक आधुनिक वैधानिक चौकट प्रदान करतो.

भारत पाक सामना

भारत आणि पाकिस्तानच्या १९ वर्षांखालील क्रिकेट संघांमध्ये दुबई इथं आशिया चषक स्पर्धेचा अंतिम सामना  सामन्यात पाकिस्ताननं भारताचा 191 धावांनी पराभव केला असून अंडर नाईन्टीन एशिया कप जिंकला आहे पाकिस्तानकडून 172 धावांची खेळी करणाऱ्या समीर मिनाज याला सामनावीर आणि प्लेयर ऑफ द सिरीज म्हणून घोषित करण्यात आले आहे . आजच्या सामन्यात पाकिस्तानन दिलेल्या 347 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय संघ केवळ 156 धावाच काढू शकला

हवामान

हवामान ! आज विदर्भात सर्वात कमी तापमानाची दोन नागपूर येथे आठ अंश सेल्सिअस करण्यात आली असून वर्धा येथे आठ पूर्णांक दोन यवतमाळ येथे आठ पूर्णांक पाच अमरावती येथे नऊ अकोला बुलढाणा येथे दहा अंश सेल्सिअस तर गडचिरोली येथे बारा अंश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आली

*****